मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत मुल्यमापन कालावधीत बदल करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२,E- १६८६२४७/यो-११**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक : ०३ जुलै, २०२६**

वाचा :

१. ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्र: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/यो-११, दि.२७.०३.२०२६
२. ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/ यो-११, दि.१४.०४.२०२६
३. ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१३४८८०४/ यो-११, दि.०४.०६.२०२६

प्रस्तावना:

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकान्वये सन २०२५-२६ करिता जिल्हास्तरीय मुल्यमापन कालावधीत वाढ करून त्याअनुषंगाने विभाग व राज्यस्तरीय मुल्यमापन कालावधीत बदल करण्यात आला होता. तथापि, जिल्हास्तरीय मुल्यमापनादरम्यान ग्रामपंचायतींच्या स्वमुल्यांकन प्रस्तावांची छाननी, पुराव्यांची पडताळणी व मूल्यमापन प्रक्रिया गुणवत्तापूर्ण व पारदर्शकरित्या पूर्ण करण्यासाठी अधिक कालावधी लागला असल्याने जिल्हास्तरीय मुल्यमापनाची प्रक्रिया दि.३०.०६.२०२६ पर्यंत पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे विभाग व राज्यस्तरीय मुल्यमापनासाठी सुधारित कालावधीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:

सन २०२५-२६ करिता मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत विभाग व राज्यस्तरीय मुल्यमापनासाठी खालीलप्रमाणे सुधारित कालावधीस मान्यता देण्यात येत आहे.

**१. विभागस्तरीय मुल्यमापन :- दि. ०५ जुलै, २०२६ ते दि.२० जुलै, २०२६**

**२. राज्यस्तरीय मुल्यमापन :- दि.२१ जुलै, २०२६ ते दि.०५ ऑगस्ट, २०२६**

२. संदर्भाधिन शासन परिपत्रकांतील इतर सूचना/अटी शर्ती कायम राहतील.

**३.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०७०३१७२६१८५६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2026.07.03 19:18:22 +05'30'

**(प्रशांत पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य,
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई,
११.विभागीय आयुक्त, सर्व,
१२.जिल्हाधिकारी, सर्व,
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
१४.अपर आयुक्त(विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व,
१५.निवडनस्ती यो-११.